**प्रतिवादीतर्फे ॲड. डी.बी.देशमुख यांच्यामार्फत वादीतर्फे वादी क्र. ६ याचा उलटतपास शपथेवर सुरु –**

१. वादी क्र. १ हा माझा मोठा भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, मी वादी क्र. १ यास जबाब देण्याचा अधिकार दिला होता. त्याप्रमाणे त्यांनी जबाब दिलेला आहे. तो मला मान्य आहे. तरी देखील मी पुरावा का देत आहे याचे कारण मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझे पुराव्याचे शपथपत्र व वादी क्र. १ यांनी दिलेले शपथपत्र यामधील मजकूर सारखाच आहे. हे म्हणणे खरे आहे की, वादी क्र. १ चा घेतलेला उलटतपास मला मान्य आहे.

२. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०७ मधील संपूर्ण क्षेत्र काशिनाथ पोटे यांच्या नावावर होते. काशिनाथ यांना दादा भाऊराव पोटे, भिमराज भाऊराव पोटे, नंदराम भाऊराव पोटे असे तीन भाऊ होते. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र.१०७ हा कर्ता पुरुष म्हणून काशिनाथ पोटे यांच्या नावे होता. प्रतिवादी क्र. १ याचे आमच्याशी काय नाते आहे हे मी सांगू शकत नाही. प्रतिवादी क्र. १ व ३ यांच्या नावे दावा मिळकतीपैकी जमीन कशी आली हे मी सांगू शकत नाही. गट क्र. १०७ चे सरस निरस मनाने वाटप झालेले आहे का हे मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे आहे की, कुटुंब मोठे झाल्याने कुटुंब व्यवस्था म्हणून काशिनाथ यांनी दावा मिळकत ही वादी व प्रतिवादी यांच्या नावे वहिवाटीसाठी करुन दिलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी

पाडलेले बांध सध्या देखील तसेच आहेत. हे म्हणणे खरे नाही की, बांधावर तेव्हापासून मोठमोठी झाडे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, बांधावर झाडे असल्यामुळे कोणीही बांध इकडे तिकडे सरकवू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सोयीसाठी जमीन नावावर केलेली असल्यामुळे तसेच वाटप न झाल्यामुळे कोणाच्या नावे किती क्षेत्र आहे हे निश्चित नाही.

३. हे म्हणणे खरे आहे की, गट क्र. १०७ ची आजपर्यंत कधीही मोजणी झालेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, काशिनाथ यांच्या नावे असलेले गट क्र. १०७/१/ब हा वाटप न झाल्याने एकत्रात आहे. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १०७/१/ब याचे वाटप झालेले आहे व तो काशिनाथ च्या वारसांचा आहे हे दाखविण्याकरीता प्रस्तुतचा खोटा दावा दाखल केला आहे. काशिनाथ पोटे हे सन २००४ मध्ये मयत झाले. हे म्हणणे खरे आहे की, तेव्हापासून आजपर्यंत त्यांचे वारस गट क्र. १०७/१/ब याच्या रेकॉर्डला लावलेले नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, त्या मिळकतीमध्ये प्रतिवादींचा देखील हिस्सा असल्याने आजपर्यंत त्यास वारस लावलेले नाहीत. हे मी सांगू शकत नाही की, गट क्र. १०७ ची फाळणी न झाल्याने त्याचा स्वतंत्र नकाशा भूमि अभिलेख कार्यालयाकडे उपलब्ध नाही. हे मी सांगू शकत नाही की, त्यामुळे गट क्र. १०७ च्या पोट हिश्याची मोजणी करता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र. १०७ या पूर्ण गटाची मोजणी करण्याकरीता आवश्यक असणारी फी भरावी लागू नये म्हणून आम्ही

खोटा दावा दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादींने कोणतेही अतिक्रमण केलेले नाही.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृती,**

स्वाक्षरीत/–
(**संध्या यु. सुळ**)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
नेवासा

दिनांक–०३/१२/२०२४.